UGC CARE Listed
ISSN No.2394-5990

# संशोधक

वर्ष : ९० • मार्च २०२२ पुरवणी विशेषांक





इतिहासाचार्य वि. का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

ISSN No. 2394-5990

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

पुरवणी अंक – मार्च २०२२ (त्रैमासिक)

● शके १९४३ ● वर्ष : ९० ● अंक : ६

संपादक मंडळ

● प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे ● प्रा.डॉ.मृदुला वर्मा ● प्रा.श्रीपाद नांदेडकर

**सहसंपादक** : डॉ.अर्जुन नेरकर व डॉ.संजय खैरनार; डॉ.राजेंद्र त्रिभुवन.

※ प्रकाशक ※

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१.

दूरध्वनी (०२५६२) २३३८४८

कार्यालयीन वेळ

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवार सुटी)

मूल्य ₹ १००/-

वार्षिक वर्गणी ₹ ५००/-; आजीव वर्गणी ₹ ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना** : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळवणी** : अनिल साठये, बावधन, पुणे 21.

**मुखपृष्ठावरील चित्र :**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

२३ Reflection of Women Marginalization in Select Indian English Poetry
- Dr. Mukund Bhandari, Malegaon, ------ १६३

२४ Marginalisation: Journey from Ignoring (Disregarding) to Concerning (Regarding)
- Prof.Kavita Kakhandki, Manmad ------ १७१

२५ Racism and Cast Discrimination in Afro-American Literature
- Dr. C. R. patil, Malegaon. -------------- १७८

२६ Cultural Identity Crsis In The Novels Of Toni Morrison
–Dr. P. G. Sonawane, Nardana, Tal.Sindkheda १८३

२७ Resistance of Dalit Feminism: An Outburst against Hegemonic Conventions in The Prisons We Broke - S. P. kamble, Satana, Nasik ---- १९२

२८ Still I Rise: A Suitable Gesture to Marginalization
- Dr.Manisha Gaikwad, Yeola, Nasik --------- २०२

२९ The Game of Masking and Unmasking in When I Hid My Caste
- Dr. R. Tribhuvan, Malegaon ------------ २०८

३० दलित स्त्रियांच्या आत्मकथनातील सांस्कृतिक संघर्ष
- डॉ.विद्या सुर्वे, नाशिक ------------------ २१७

३१ दलित कथेतील सामाजिकता
- डॉ.स्नेहल मराठे, मालेगाव ------------------ २२८

३२ 'शापित' कादंबरीतील समाजचित्रण
- प्रा.सुनिता उफाडे, निफाड ------------------ २३३

# दलित कथेतील सामाजिकता

– डॉ. स्नेहल मराठे, मालेगाव

प्रास्ताविक :

स्वातंत्र्योत्तर काळात मराठी साहित्यामध्ये ज्या विविध घडामोडी झाल्या, जी स्थित्यंतरे घडून आली, त्यातील मराठी वांगमय क्षेत्रातील सर्वाधिक महत्त्वाचे स्थित्यंतर म्हणजे दलित साहित्यनिर्मिती.

ग्रामीण साहित्य, जनवादी साहित्य, आदिवासी साहित्य, देशी साहित्य इत्यादी ह्या सर्व साहित्य प्रवाहांमध्ये दलित साहित्य प्रवाह सकस आणि पुरोगामी ठरला. हा एक सामर्थ्यवान प्रवाह आहे. या साहित्य प्रवाहाने सर्वसामान्य माणसांचे जीवनचित्रण पहिल्यांदा साहित्यात घडविले. दलित साहित्य प्रवाहामुळे पीडित व शोषित समाजाला आपले विचार मांडण्यासाठी विचारपीठ उपलब्ध झाले. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीने जागृत झालेल्या दलित समाजात स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा प्रसार झाला. स्वतःच्या समाजाची शतकानुशतकांपासून चालत आलेली दुःस्थिती, ती निर्माण होण्याची कारणे याचा विचार दलित तरुण करू लागले. डॉ. आंबेडकर यांच्या कार्याने व विचाराने जागृत केलेल्या दलितांना आत्मभान आले. त्यामुळे डॉ. आंबेडकर हेच दलित साहित्याचे प्रेरणास्थान होते असे मानावे लागते. पुढे काही दलित कथाकारांच्या कथेतील सामाजिकतेचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

श्री. म. माटे -- कथा हा दलित साहित्यातील एक अतिशय सकस असा वांग्मय प्रकार आहे. दलित ग्रामीण जीवनाचे विविधांगी दर्शन या कथांमध्ये होते. श्री. म. माटे हे कालच्या व आजच्याही दलित ग्रामीण कथाकारांचे एक प्रकारे पितामहच्च होत. त्यांनी 'बन्सिधरा, तू कुठे रे जाशील?' अशा शीर्षकाची कथा लिहून मराठी वाचकाला प्रथमच दलितविश्वाचा परिचय करून दिला. 'उपेक्षितांचे अंतरंग' या संग्रहात माटे यांनी गावकुसाबाहेरच्या वस्तीचे दर्शन मराठी वाचकांना करून दिले. प्रत्येक माणसाला स्वातंत्र्य, प्रतिष्ठा आणि भीतीशून्य सुरक्षितता मिळाली पाहिजे ही दलित चळवळीची मुख्य मागणी होती. गावकुसाबाहेरच्या माणसाच्या मनात ही विषमता आपल्या वाट्याला का आली असा प्रश्न निर्माण

होतो. आपल्या या परिस्थितीला वर्णव्यवस्था जबाबदार आहे, जातिव्यवस्था जबाबदार आहे, या व्यवस्थांना पवित्र मानणारा धर्म जबाबदार आहे, म्हणून ही व्यवस्था पार बदलून टाकणे आवश्यक आहे, अशी सुस्पष्ट जीवनविषयक दृष्टी अण्णाभाऊ साठे यांच्या दिसून येते.

**अण्णाभाऊ साठे --** दलित कथेचे शिल्पकार म्हणून अण्णाभाऊ साठे यांचा गौरवाने उल्लेख करावा लागतो. ज्या जातीचे अस्तित्वच नाकारले होते, त्या मांग जातीत अण्णाभाऊ साठे यांचा जन्म झाला. उपेक्षित जातीत जन्मलेल्या अण्णाभाऊंनी या उपेक्षित जातीतील जीवनानुभव प्रत्यक्ष अनुभवले होते. अस्पृश्यतेचे चटके बालवयापासूनच शाळेतही अनुभवायला मिळाल्यामुळे त्यांचे शिक्षण झाले नाही. ते भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य होते. अस्पृश्य दलित मजुरांना संघटित करण्यासाठी त्याला आत्मभान असणे अत्यंत आवश्यक आहे असे अण्णाभाऊंना वाटत होते. म्हणून अण्णाभाऊंचे अनेक नायक बंड करून उठणारे, विद्रोही आहेत. पोटाची भूक हीच मुळात माणसाला लाचार करते, म्हणून ती सन्मानाने भागली पाहिजे, अशी शिकवण अण्णाभाऊंचे नायक देतात. हा भुकेचा प्रश्न सुटणे तर आवश्यक पण तो समता आणि न्याय या मूल्यांच्या आधारे सुटावा, अशी ठाम भूमिका अण्णाभाऊंच्या पात्रांची आहे. भटके आणि जागते यांचेही चित्रण ते आपल्या कथेत करतात. त्यांनी आपल्या कथांमधून मुंबईच्या वकाल वस्तीत जगणार्या व जगण्याची जबरदस्त इच्छा असलेल्या गुन्हेगार जमातीतल्या माणसाचे त्यांच्या जीवनाचे अनुभव कथेत चित्रित केले आहे. त्यांच्या कथेतील स्त्री व्यक्तिरेखा या शूर धाडसी आणि साहसी आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार प्रबोधनातून आव्हानातून दलित स्त्रीची निर्माण झालेली अस्मिता व जागृती याबरोबरच झालेल्या अन्यायाविरुद्ध संघर्ष यांचे चित्रण अण्णाभाऊ साठेंच्या कथेत दिसते. ‘आबी’, ‘खुळंवाडी’, ‘लाडी’, ‘फरारी’, ‘गजाआड’, ‘भानामती’ इत्यादी त्यांचे कथासंग्रह आहेत. त्यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचे जीवन त्यांच्या कथांमधून प्रतिबिंबित झालेले आहे.

**शंकरराव खरात --** दलित कथेचे शिल्पकार म्हणून शंकरराव खरात यांना संबोधले जाते. त्यांचे संपूर्ण साहित्य हे वास्तवातून जन्माला आले आहे. त्यांनी

...त्यक्षात जे जीवन भोगले, अनुभवले त्याचे जीवनचित्रण त्यांच्या साहित्य लेखनात आले आहे. त्यांचा 'बारा बलुतेदार'(१९५९) हा पहिला कथासंग्रह लक्षवेधक ठरला. महार, मांग, रामोशी, कुंभार, चांभार, कोळी, परीट, न्हावी, सुतार, लोहार, सोनार आणि गुरव ही बारा बलुतेदार जुन्या ग्राम व्यवस्थेचे आधार होत. त्यांच्या जीवनाभोवती या संग्रहातील कथा आहेत. खरातांनी 'तंडीपार' (१९६१) या दुसऱ्या कथासंग्रहात वेगवेगळ्या भटक्या, गुन्हेगार जमाती, धंदेवाले इत्यादींचे जग साकार केले आहे. 'आडगावचं पाणी' (१९७०) या कथासंग्रहातील कथांमधून खरातांनी अधिक प्रमाणात स्वातंत्र्यानंतर बदलत चाललेली गावे रेखाटलेली आहेत. त्याशिवाय 'मुलाखत' (१९७८), 'माझे नाव' (१९८७), 'दौंडी' (१९९५) इत्यादी कथासंग्रहातून त्यांनी प्रस्थापित समाजव्यवस्थेने बहुजन समाजव्यवस्थेवर केलेल्या अन्याय अत्याचाराचे सौम्य पण नेमक्या भाषेत चित्रण केले आहे. 'गावशिव' (१९७०) या कथासंग्रहात आपल्या अंगच्या पारंपारिक कला ज्ञानाच्या आधारावर कशीबशी गुजराण करणाऱ्या माणसांच्या कथा आहेत. खरातांच्या कथेतील निवेदक घटनांचा साक्षीदार म्हणून येतो. दलितांचे जग नव्या बदलत्या परिस्थितीत कोणत्या समस्यांशी सामना द्यायला उभे आहे, याचा शोध कथांमधून खरात घेण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

बाबुराव बागुल -- दलित कथेची जडणघडण होत असताना तिला मानाचे स्थान मिळवून देणारे विद्रोही साहित्यिक म्हणजे बाबुराव बागुल होत. त्यांनी स्वतः आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीशी संघर्ष केला आहे. बागुल यांची कथा वेदनांचे व दुःखाचे चित्रण करते. त्यात प्रखर वास्तव, व्यापक सामाजिक भान, पराकोटीचा संघर्ष, दुःख, भुकेची वेदना प्रकट झाली आहे. मुळातच समता, न्याय आणि मानवतेसाठी टाहो फोडणारी संघर्षशील कथा त्यांनी लिहिली आहे. सामाजिक आर्थिक शोषणासंबंधीचे प्रश्न त्यांच्या कथेने फुले - आंबेडकर यांच्या प्रेरक विचारातूनच चित्रित केले आहे. या शोषणाच्या मुळाशी मानवनिर्मित जातव्यवस्थाच कारण ठरते. हे त्यांच्या कथेतून अधोरेखित होते. 'जेव्हा मी जात चोरली होती' (१९६३) या कथासंग्रहातील कथांमधून भारतीय समाज व्यवस्थेने माणूसपण नाकारलेल्या दलित, शोषित, वंचित, पीडित लोकांचे जीवन चित्रित

समाजघटकांमधील ताणतणाव चित्रित केलेला आहे. बदलत्या दलित जीवनातील अनेकविध समस्या, ग्रामीण दलितांवर होणारे अत्याचार, दलित समाजघटकांमधील अंतर्विरोध या सार्यांचे चित्रण डांगळे यांनी बारकाईने आणि दलित जीवनाविषयी वाटणाऱ्या आत्मभावाने केले आहे. 'आणि बुद्ध मरुन पडला' आणि 'घुसमट' या त्यांच्या कथा उल्लेखनीय आहे. वामन होवाळ यांच्या 'येळकोट', 'वारसदार', 'वाटा आडवाटा' या कथासंग्रहातून माणसा-माणसांतील नातेसंबंध, वैचारिक निष्ठा आणि ज़गणे यांची वर्णन आले आहे. अविनाश डोळस यांच्या 'महासंगर' या कथासंग्रहातील तरुणाला प्रत्यक्ष समाजात वावरतांना जो भीषण अनुभव येतो, त्याचे प्रत्ययकारी चित्रण त्यांच्या कथेत येते.

समारोप -- ह्या सर्व दलित कथांचा एकत्रित विचार करता असे जाणवते की, समाजदर्शनपरता हा त्यांचा विशेष आहे. बाबुराव बागुल, अर्जुन डांगळे यांच्या काही कथा हे लेखन समाजदर्शन वर्णनाच्या पातळीवरच राहिलेले आहे. दलित कथाकारांचे अनुभव अस्सल आहेत. आपल्या कथांमध्ये रंजकता कमी आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. दाहक वास्तवाचे त्यांचे भान पक्के आहे. दलित कथांमध्ये ठळकपणे सवर्णांशी संघर्ष आहे. चातुर्वर्ण व्यवस्थेविरुद्ध आवाज आहे. आपल्या मनाला केंद्रस्थानी ठेवून कथा लिहिण्याची प्रवृत्ती दलित कथाकारांची दिसते.

**संदर्भसूची :-**

१) शतकातील दलित विचार - डॉ.शरणकुमार लिंबाळे, दिलिपराज प्रकाशन.
२) दलित साहित्यः प्रवाह आणि प्रकार - डॉ. अविनाश सांगोलेकर, प्रतिमा प्रकाशन.
३) साठोत्तरी साहित्य प्रवाह - डॉ. प्रल्हाद लुलेकर.
४) मराठी साहित्यः प्रेरणा व स्वरूप - संपा.गो.मा. पवार, म.द. हातकणंगलेकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
५) ग्रामीण - दलित साहित्यः चळवळ आणि समीक्षा - डॉ. मधुकर मोकाशी, स्नेहवर्धन प्रकाशन.

* * *

केले आहे. त्यांच्या कथेतील माणसे खुनशी, गुन्हेगार, बहिष्कृत आहेत. त्यांच्या या जीवन जगण्याला विषम व्यवस्था कारण ठरली आहे. स्त्रीचे जीवन व तिचे प्रश्न बाबुराव बागुल तळमळीने रेखाटतात. त्यांचे अस्सल जीवन दर्शन घडवतात. त्यांची कथा वाचकाला विचार करायला प्रवृत्त करते. 'मरण स्वस्त होत आहे' (१९६९) या त्यांच्या कथासंग्रहात मुंबईच्या झोपडपट्टीतील माणसांचे स्वस्त झालेले मरण हा विषय आहे. झोपडपट्टीत राहणारी बेदखल माणसे आणि त्यांची चिंताजनक भयंकर स्थिती विदारक आहे. भूक शमविण्यासाठी ते अमानुष वर्तन करतात, त्यामुळे ती गुन्हेगार बनतात. बाबुराव बागुल माणसांच्या या वर्तनाच्या कारणांचा शोध घेतात. बागुलांच्या कथा एका व्यक्तीभोवती गुंफलेल्या असतात. ह्या व्यक्ती चारचौघींसारख्या मुळीच नसतात. त्यांची 'सूड' ही दीर्घकथा एका भीषण वास्तवाचे दर्शन घडवते. बागुलांच्या कथेला सामाजिक बांधिलकीची जोड मिळालेली आहे. बागुल यांची कथा ही मराठी कथेच्या वाटचालीतील एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. बाबुरावांच्या कथेत वर्णव्यवस्था आणि अर्थव्यवस्था या दोन्हींच्या चरकात ज्यांच्या आयुष्याच्या चिंध्या उडाल्या आहेत अशी पात्रे येतात. या पात्रांचा संघर्ष दोन पातळ्यांवर असतो. एक तर तो प्रस्थापित समाज रचनेविरुद्धचा असतोच, पण त्याच वेळी तो मानवी मूल्यांसाठी आहे त्या परिस्थितीत संघर्ष करणाऱ्या व क्रमाने होत जाणाऱ्या माणसांचाही संघर्ष असतो. बागुल यांच्या कथेतील माणसे संस्कृतीपासून दूर आहेत. राग, लोभ, द्वेष, मत्सर, काम या सर्व मानवी प्रवृत्ती त्यांच्यात तीव्र स्वरूपात आहेत. या माणसांच्या वस्तीचा भूगोल आणि संस्कृती यांचे समग्र चित्र बागुलांची कथा रेखाटते. बागुलांच्या कथालेखनातून प्रगल्भ सामाजिक जाणीव प्रकट होते. त्यामुळे त्यांच्या कथेतील सर्व प्रकारच्या माणसांबद्दल सहानुभूतीच वाटते. स्वातंत्र्योत्तर काळातील अग्रगण्य मराठी कथाकारांमध्ये बागुल यांची गणना करता येते.

**अन्य दलित कथाकार**-- बागुलांनंतर दलित कथाकारांमध्ये अर्जुन डांगळे यांचा 'ही बांधावरची माणसं', योगिराज वाघमारे यांचा 'उद्रेक', योगेंद्र मेश्राम यांचा 'रक्ताळलेली लक्तरं' या कथासंग्रहांमधून दलित- ग्रामीण जीवनातील दैन्य व दुःख साकारलेले आहे. मेश्राम यांच्या 'जटायू' या दीर्घकथेत दलित